लोकमत

# वैद्यकीय महाविद्यालयास कोरोना स्वॅब कॅबिन भेट

## रोटरी क्लबचा पुढाकार : जेडीआयईटीचे तंत्र सहाय्य




लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ** : वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सातत्याने कोरोना पॉझिटिव्ह व कोरोना संशयित रुग्ण दाखल होत आहे. कोरोना संशयितांच्या घशाचे स्वॅब घेताना डॉक्टरांचा थेट संपर्क येतो. हे टाळण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयाला कोरोना स्वॅब कॅबिन भेट देण्यात आली. रोटरी क्लबच्या पुढाकारात जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तंत्र सहाय्याने हे कॅबिन तयार करण्यात आले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील गर्ल्स होस्टेलमध्ये असलेल्या विलगिकरण कक्षात कोरोना स्वॅब कॅबिन देण्यात आली. या लोकार्पणप्रसंगी जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटीचे सचिव किशोर दर्डा, रोटरी क्लब ऑफ यवतमाळचे अध्यक्ष राजेश गढीकर, अधिष्ठाता डॉ.राजेश सिंग, कोरोना समन्वयक डॉ.मिलिंद कांबळे, डॉ.सुरेंद्र गवार्ले, जेडीआयईटीचे प्राचार्य डॉ.राम तत्त्ववादी, रोटरीचे सचिव दिलीप राखे उपस्थित होते.

जेडीआयईटीचे प्राचार्य डॉ.राम तत्त्ववादी यांच्या मार्गदर्शनात प्रा.राहुल शेरेकर, तंत्रज्ञ नितीन शेंदरे, विनोद विलायतकर, प्रसन्न कुलगिवार, मंगल बावणे यांनी कोरोना स्वॅब कॅबिन तयार केले. या कॅबिनमुळे डॉक्टरांना सुरक्षित राहून कोरोना संशयित रुग्णाच्या घशातील स्वॅब घेता येणार आहे. रोटरी क्लब व जेडीआयईटीच्या माध्यमातून उपयोगी मदत मेडिकल टिमला झाल्याची प्रतिक्रिया अधिष्ठाता डॉ.राजेश सिंग यांनी व्यक्त केली.